| MHRT140000772024 | **म.कौ.हिं.सं.का.अर्ज क्र.०४/२०२४**<br>(निशा महेश भातकुंटे उर्फ निशा पांडुरंग जाधव व.३<br>विरूध्द<br>महेश सखाराम भातकुंटे व.३) |
|---|---|

## निशाणी ०५ वरील पारित आदेश

प्रस्तुत अर्ज हा अर्जदार हिने सामनेवाला क्र.१ याचे विरूध्द कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ (थोडक्यात म.सं.कौ.हिं.का.) अन्वये अंतरिम पोटगी मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

**अर्जदार हिचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे :**

२. अर्जदाराच्या अर्जातील कथनानुसार, अर्जदार क्र.१ व सामनेवाला क्र.१ यांचा विवाह दि.३०/१२/२०१३ रोजी ता. दापोली, जि. रत्नागिरी येथे संपन्न झाला. विवाहानंतर अर्जदार क्र.१ ही तिचे सासरी नांदावयास गेली. अर्जदार क्र.१ व सामनेवाला क्र.१ यांना अर्जदार क्र.२ अद्विक व अर्जदार क्र.३ तक्ष ही अपत्ये आहेत. सामनेवाला क्र.२ व ३ हे अनुक्रमे अर्जदार क्र.१ चे सासरे व सासू आहेत. सामनेवाला याने अर्जदार क्र.१ हिला वारंवार मारहाण व शिवीगाळ करून तिचा मानसिक व शारीरिक छळ करून तिचा व मुलांचा जाणीवपूर्वक त्याग केला असलेने अर्जदारांना माहेरी राहावे लागत आहे. तसेच सामनेवाला याने अर्जदार क्र.२ व ३ यांना शिक्षणापासून वंचित ठेवले आहे.

३. अर्जदार हिने पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार क्र.१ तसेच अर्जदार क्र.२ व ३ यांचे पालनपोषण, अन्न, वस्त्र, निवारा, औषधोपचार व शिक्षणाची भागवणे ही सामनेवाला क्र.१ याची कायदेशीर व नैतिक जबाबदारी असूनही त्याने ती पार पाडलेली नाही. अर्जदार क्र.१ हिला कोणतेही उत्पन्नाचे साधन नसून ती स्वतःचा

व मुलांचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे. याउलट, सामनेवाला याची आर्थिक स्थिती सधन असून सामनेवाला क्र.१ हा इलेक्ट्रिशियन व्यवसाय करून दरमहा सुमारे रु.६०,०००/– उत्पन्न मिळवितो, तर सामनेवाला क्र.२ यांना शेती व्यवसायातून वार्षिक सुमारे रु.५,००,०००/– उत्पन्न प्राप्त होते. तसेच त्यांच्याकडे वडिलोपार्जित घर व शेती देखिल आहे. सबब, सामनेवाला क्र.१ याने अर्जदार क्र.१ ते ३ यांना प्रत्येकी दरमहा रु.८,०००/– प्रमाणे अंतरिम पोटगी द्यावी अशी मागणी अर्जदार हिने केली आहे.

<u>सामनेवाला क्र.१ याचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे</u> :

**४.** प्रस्तुत प्रकरणामध्ये सामनेवाला क्र.२ व ३ हे नोटीसची बजावणी होऊन देखील न्यायालयासमोर हजर झाले नाहीत. सबब, प्रस्तुत अर्ज त्यांचेविरूध्द एकतर्फा चालविणेबाबतचा आदेश दि.१६/०५/२०२४ रोजी नि.०१ वरती पारित करणेत आला. प्रस्तुत प्रकरणात सामनेवाला क्र.१ हजर होऊन देखिल त्याने मुख्य अर्जावर तसेच अंतरिम अर्जावर म्हणणे दाखल न केलेने त्यांचेविरूध्द विनाम्हणणे चालविणेबाबतचा आदेश दि.१६/०७/२०२४ रोजी पारित करणेत आला. त्यानंतर सामनेवाला क्र.१ याने विनाजबाब म्हणणे आदेश रद्द होणेसाठी अर्ज दाखल केला. सदर अर्ज मंजूर करणेत आला. त्यानंतर सामनेवाला क्र.१ याने नि.४९ वर त्याचे म्हणणे दाखल केले. परंतु अंतरिम अर्ज (नि.५) वर म्हणणे दाखल केले नाही. आज रोजी सामनेवाला क्र.१ तर्फे विधीज्ञ यांनी मुख्य अर्जावरील सामनेवाला क्र.१ याचे म्हणणे हेच अंतरिम पोटगी अर्जावरील म्हणणे असलेबाबत पुरशीस दाखल केली.

**५.** सामनेवाला क्र.१ याने नि.४९ वरती त्याचे म्हणणे दाखल करून अर्जदाराची कथने पूर्णपणे नाकारली. त्याने असे कथन केले की, अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांचे घरची आर्थिक परिस्थिती मध्यम दर्जाची असून अर्जदाराचे घरी तिचे वडीलांसमवेत अर्जदार वास्तव्य करत असताना सन २०२४ सालापर्यंत सामनेवाला

क्र.१ हा घरजावई म्हणून अर्जदाराचे माहेरी राहिलेला आहे. सामनेवाला क्र.१ हा रोजंदारीचे काम करीत असे व त्याला त्यापासून दिवसाचे शंभर रूपये मिळत असत. हे अर्जदाराला मान्य नव्हते. तसेच सामनेवाला क्र.१ हा जादाची मोलमजूरी करीत असलेमुळे त्याला घरी येणेस उशीर होत असे त्यामुळे अर्जदार त्याचेवर संशय घेत असे व त्यामुळे त्यांचेमध्ये वाद होत असत. परंतु आजदेखिल तो अर्जदारासोबत संसार करणेस इच्छुक आहे. सामनेवाला क्र.१ हा मोलमजूरीचे काम करून दरमहा रू.४,०००/– एवढी मजूरी मिळवतो. सामनेवाला क्र.१ याच्यावर सामनेवाला क्र.२ व ३ हे अवलंबून असून अर्जदार क्र.२ व ३ हे देखिल त्याचेकडे राहत आहेत. सबब, त्यांचे पालनपोषण देखिल सामनेवाला क्र.१ करीत आहे. सबब, सामनेवाला क्र.१ हा अर्जदाराला पोटगी देणेस सक्षम नाही. सबब, प्रस्तुत अर्ज नामंजूर करणेत यावा.

**<u>अर्जदार तर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद</u> :**

**६.** अर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. ए. पी. सुळे यांनी असा युक्तीवाद केला की, सामनेवाला क्र.१ याने त्यांचे मूळ अर्जावरील म्हणणेमध्ये अर्जदारसोबत त्याचे असलेले नातेसंबंध मान्य केलेले आहेत. अर्जदार हिने केवळ तिच्या दैनंदिन गरजा भागविणेसाठी किरकोळ रकमेची अंतरिम पोटगी म्हणून मागणी केलेली आहे. अर्जदार ही नोकरी करीत नाही व तिचेकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. याउलट, सामनेवाला क्र.१ याचा व्यवसाय असून तो पुष्कळ उत्पन्न कमावत आहे. सबब, प्रस्तुत अर्ज मंजूर करणेत यावा.

**<u>सामनेवाला तर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद :</u>**

**७.** याउलट, सामनेवाला क्र.१ याचेतर्फे विधीज्ञ श्री. शेवडे यांनी असा युक्तीवाद केला की, सामनेवाला क्र.१ हा अर्जदाराला पोटगी देणेस समक्ष नाही. तसेच त्याचेवर अर्जदार क्र.२ व ३ तसेच सामनेवाला क्र.२ व ३ यांची जबाबदारी असलेने त्याचेकडे अर्जदाराला पोटगी देणेइतकी रक्कम शिल्लक राहत नाही. सबब, प्रस्तुत अर्ज

नामंजूर करणेत यावा.

८. अर्जदार व सामनेवाला यांची कथने, कागदोपत्री पुरावा आणि अर्जदार व सामनेवाला याचे वकीलांनी केलेला युक्तीवाद यावरुन प्रस्तुत अर्जाच्या निर्णयाकरिता पुढील मुद्दे उपस्थित झालेले आहेत. सदरील मुद्यांवरील कारणमिमांसा व निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत –

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार यांनी मागणी केलेप्रमाणे, अर्जदार क्र.१ ते ३ हे सामनेवाला क्र.१ याचेकडून अंतरिम पोटगी मिळणेस पात्र आहे काय? | **... अंशत: होकारार्थी** |
| २. | आदेश काय ? | **... अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्रमांक १ करीता</u> :**

९. अर्ज व जबाब पडताळला. तसेच अर्जदार व सामनेवाला यांच्या मालमत्ता व उत्तरदायित्वाच्या शपथपत्राचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. सामनेवाला क्र.१ याने त्याचा अर्जदारांसोबतचा नातेसंबंध मान्य केलेला आहे. सामनेवाला याने हे देखील मान्य केले आहे की, त्याचा अर्जदार यांचेसोबतचा नातेसंबंध आज रोजी देखील अस्तित्वात आहे. अर्जदार हिने तिचेवर झालेल्या कौटुंबिक हिंसाचाराबद्दल कथन केले आहे. अर्जदाराने तिचे कथनाचे पुष्ठ्यर्थ शपथपत्र दाखल केलेले आहे. अर्जदाराने प्रस्तुत अर्जात व शपथपत्रात सामनेवाला यांनी वारंवार मारहाण व शिवीगाळ केलेबाबत कथन केलेले आहे. सबब, सामनेवाला क्र.१ याने कौटुंबिक छळ केलेचे अर्जदाराने प्रथमदर्शनी सिध्द केलेले आहे. अर्जदाराचे सदर कथन हे सामनेवाला

याने पूर्णपणे अमान्य केले आहे. सबब, सदर बाब ही दोन्ही पक्षांना आपल्या कथनाच्या पुष्ठ्यर्थ पुरावा दाखल करण्याची पुरेशी संधी दिल्यानंतरच ठरवता येईल व त्यासाठी काही कालावधी लागेल. परंतु तोपर्यंत अर्जदार हिला स्वत:चे उदरनिर्वाहासाठी अंतरिम पोटगीची आवश्यकता आहे.

**१०.** प्रस्तुत प्रकरणात अर्जदार हिने तिचे कथनांचे पुष्ठ्यर्थ दस्तऐवज यादी (नि.०७) सोबत लग्नपत्रिका, लग्नाचा फोटो, अर्जदार क्र.२ याचा बोनाफाईड दाखला, अर्जदार क्र.१ ते ३ यांचे आधारकार्ड ही कागदपत्रे तसेच दस्तऐवज यादी (नि.१२) सोबत दि.०८/०४/२०२४ रोजीचा तक्रार अर्ज व एन.सी.आर. ही कागदपत्रे, दस्तऐवज यादी (नि.१८) सोबत अर्जदार क्र.३ याचा जन्मदाखला दाखल केलेला आहे. अर्जदार हिने नि.१३ वरती तिचे संपत्ती व उत्तरदायित्वाचे शपथपत्र दाखल केले आहे.

**११.** प्रस्तुत प्रकरणात सामनेवाला क्र.१ याने दस्तऐवज यादी (नि.३६) सोबत त्याचे खातेपुस्तकाचा उतारा दाखल केला आहे. सामनेवाला याने नि.३१ वरती त्याचे संपत्ती व उत्तरदायित्वाचे शपथपत्र दाखल केले आहे.

**१२.** अर्जदाराने प्रस्तुत अर्जात तिला कोणतेही उत्पन्नाचे साधन नसलेचे कथन केलेले आहे. सामनेवाला क्र.१ याने देखील त्याचे जबाबात तसेच मालमत्ता व उत्तरदायित्वाचे शपथपत्रात अर्जदार हिला उत्पन्नाचे साधन असलेबाबत कोठेही कथन केलेले नाही. सबब, अर्जदाराला कोणतेही उत्पन्नाचे साधन नसून तिला पोटगीची आवश्यकता असलेचे प्रथमदर्शनी दिसून येते. अर्जदार हिने स्वत:साठी तसेच अर्जदार क्र.२ व ३ साठी पोटगीची मागणी केली आहे. परंतु सामनेवाला क्र.१ याने त्याचे जबाबात अर्जदार क्र.२ व ३ हे त्याचेसोबत राहत असलेचे कथन केले आहे. तसेच अर्जदाराने नि.११ वर मुलांचा म्हणजेच अर्जदार क्र.२ व ३ यांचा ताबा मिळणेसाठी

अर्ज दाखल केला आहे. सबब, अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसून येते की, अर्जदार क्र.२ व ३ हे सध्या सामनेवाला क्र.१ याचेकडे आहेत. सबब, अर्जदार क्र.१ ही केवळ स्वत:साठी पोटगी मिळणेस पात्र आहे.

**१३.** अर्जदाराने प्रस्तुत अर्जात सामनेवाला क्र.१ हा शेतीमधून सुमारे वार्षिक उत्पन्न रू.५,००,०००/– तसेच इलेक्ट्रीशियनचे व्यवसायामधून दरमहा रू.६०,०००/– इतके उत्पन्न मिळवित असलेचे कथन केले आहे. परंतु सदर कथनांचे पुष्ठ्यर्थ तिने कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. सामनेवाला क्र.१ याने त्याचे मालमत्ता व उत्तरदायित्वाचे शपथपत्रामध्ये त्याचे दरमहा उत्पन्न रक्कम रू.४,०००/– असलेचे नमूद केलेले असले तरीही दरमहा रोजंदारीचा विचार करता सदर रक्कम ही आज रोजी निश्चितच चार हजार रूपयांपेक्षा अधिक असणार आहे. तसेच सामनेवाला क्र.१ हा शारीरिकदृष्ट्या सक्षम असलेने अधिक उत्पन्न कमावून अर्जदार हिचे पालनपोषण करणेची जबाबदारी सामनेवाला क्र.१ याची आहे. अभिलेखावरील दस्तऐवजांचे अवलोकन केले असता अर्जदार हिचे पालनपोषण करणेस सामनेवाला क्र.१ हा सक्षम असलेचे प्रथमदर्शनी दिसून येते. सामनेवाला याचेवर त्याच्या वृध्द आईवडिलांच्या व मुलांची देखभालीची जबाबदारी असलेचे त्याचे कथन असले तरीही अर्जदार हिचा पती म्हणून तिचे पालनपोषण करणेची सामनेवाला क्र.१ याची कायदेशीर जबाबदारी आहे.

**१४.** अर्जदार हिला उत्पन्नाचे साधन नाही. तिला तिच्या दैनंदिन गरजा व इतर खर्चासाठी पोटगीची आवश्यकता आहे. तरी अर्जदार हिची जीवनशैली, तिचे वय, दैनंदिन गरजा तसेच सामनेवाला याचे उत्पन्न या सर्व बाबींचा विचार करता, अर्जदार हिला दरमहा अंतरीम पोटगी रुपये ३०००/– मंजूर करणे न्यायाचे दृष्टीने उचित होईल. सबब, मुद्दा क्र.१ चे उत्तर अंशत: होकारार्थी देऊन मुद्दा क्र.२ साठी मी खालील आदेश पारित करते.

## :: आ दे श ::

१. अर्ज (निशाणी क्र.०५) अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. सामनेवाला क्र.१ यास निर्देशित करण्यात येते की, त्याने अंतरिम पोटगी म्हणून अर्जदार क्र.१ हिला दरमहा रुपये ३,०००/– (अक्षरी रुपये तीन हजार मात्र) प्रस्तुत अर्ज दाखल केल्याच्या दिनांकापासून ते मूळ अर्जाचा अंतिम निकाल होईपर्यंत द्यावेत.

३. सदर आदेशाची प्रत ही अर्जदार, सामनेवाला, संबंधित पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी व संरक्षण अधिकारी यांना विनामूल्य देणेत यावी.

**(आदेश खुल्या न्यायालयात घोषित)**

AMRUTA CHARUDATTA JOSHI
Digitally signed by AMRUTA CHARUDATTA JOSHI
Date: 2026.06.05 17:20:08 +0530

**दिनांक – ०५/०६/२०२६.**
**ठिकाण – मंडणगड.**

**(अमृता चा. जोशी)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मंडणगड.**

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| **I affirm that the contents of this Pdf file judgment/order are same words as per original judgment/order.** | | |
| **Court Name** | :- | **Civil Judge, J.D. & J.M.F.C., Mandangad, Taluka Mandangad, District- Ratnagiri.** |
| **Name of Stenographer** | :- | Shri. A. J. Sagvekar |
| **Date of Decision** | :- | 05/06/2026 |
| **Judgment/order signed by P.O. on** | :- | 05/06/2026 |
| **Judgment/order uploaded on** | :- | 05/06/2026 |